क्र/जि.ग्रा.वि.यं./986/2026
दि. 07/05/2026

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
# जिल्हा परिषद, चंद्रपूर
## दरपत्रक प्रक्रियेद्वारे कार्यालयीन वाहनाचा पुरवठा करणेकरीता नोटीस

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत खालील नमूद वाहन कार्यालयीन कामाकरीता मासिक भाडेतत्वावर वाहन पुरवठा करंण्याकरीता १ वर्षाकरीता दरपत्रक प्रक्रियेद्वारे दर मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विवरण | पुरवठयाची व्याप्ती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Model of Vehicle | Terms | Unit | Quantity per Month | Rate per Unit in Rs. | Total Amount per Month |
| 1 | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, चंद्रपूर या कार्यालयाकरीता वाहन उपलब्ध करण्याबाबत. | A. मासिक तत्वावर पुरवायचे वाहन (On Monthly basis) | | | | | |
| | | Scorpio/ Bolero / Ertiga or equivalent (Air Conditioned) | Minimum Distance Kms. 2000 (Local & out station) | Monthly Vehicle Rate | 1 Vehicle | | |
| | | | Rate per Km above 2000 Km | 1 KM | | | |
| | | B. आवश्यकतेनुसार पुरवायचे वाहन (On call basis) | | | | | |
| | | Scorpio/ Bolero / Ertiga or equivalent (Air Conditioned) | Minimum Distance KMs 150 Kms & 12 Hrs duty | vehicle/ day | | | |
| | | | Rate for extra Km above 150 Km | 1 KM | | | |
| 2 | अटी व शर्ती | स्वतंत्ररित्या नोटीस बोर्डवर प्रकाशित केली आहे | | | | | |
| 3 | दरपत्रक सादर करण्यासाठी दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक 08/05/2026 ते 18/05/2026 सायंकाळी 5.00 पर्यंत (कार्यालयीन कामाचे दिवशी फक्त) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, चंद्रपूर | | | | | |
| 4 | दरपत्रक उघडण्याचे दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक 19/05/2026 सकाळी 11.00 वाजता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, चंद्रपूर | | | | | |

## अटी व शर्ती :-

1. दरपत्रक कार्यालयीन कामाचे वेळेत दिनांक 08/05/2026 ते 18/05/2026 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.
2. दरपत्रक दिनांक 19/05/ 2026 रोजी सकाळी 11.00 वा उपस्थित दरपत्रक धारकाचे समक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद चंद्रपूर या कार्यालयात उघडण्यात येईल .
3. सदर निविदा दोन लिफापा (तांत्रिक व आर्थीक) पदध्दतीने बंद लिफाप्यात सादर करणे आवश्यक आहे.
4. निविदाधारकांनी तांत्रीक लिफाप्यासोबत फार्म-अ व फार्म-क सादर करणे आवश्यक आहे.
5. निवीदाधारकांनी (तांत्रीक) फार्म-अ सोबत दरपत्रकधारकास कोणत्याही शासकिय/ निमशासकिय कार्यालयाने काळया यादीत समाविष्ट केले नसल्याबाबत तसेच दरपत्रक धारक यांचेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत साक्षंकित कलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

6. निवीदाधारकांनी आर्थीक निवीदा सादर करणे आवश्यक आहे. जे पुरवठादार तांत्रीक बाबीमध्ये पात्र होतील त्याच पुरवाठादाराचे आर्थीक लिफापा उघडण्यात येईल.
7. मंजूर दर आदेशीत दिनांकापासून पुढिल 1 वर्षाकरीता लागू राहील.
8. **दर सादर करीत असतांना जि.एस.टी. सह दर सादर करण्यात यावे.** देयके अदा करतांना शासन नियमानुसार आवश्यक ते कराची वसुल करण्यात येईल.
9. कोणतेही कारण न देता दरपत्रक कोणत्याही टप्प्यावर अशंत: व पुर्णत: रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.
10. पुरवठा प्रक्रियेबाबत काही वाद उद्‌भवल्यास त्या संबधाने कायदेशिर कार्यवाही चा कक्ष जिल्हा सत्र न्यायालय चंद्रपूर असेल.
11. ज्या पुरवाठाधारकाचे दरपत्रक सर्वात कमी रक्कमेच्या (एल-1 निविदाधारक) निविदाधारकाला करार देण्यात येईल. व ज्या पुरवठाधारकाचे दरपत्रक मान्य केल्या जाईल त्यांना कोणत्याही स्वरूपाचे अग्रीम दिल्या जाणार नाही.
12. ज्यांची निविदा स्विकारल्या गेली असेल तसे यशस्वी निविदाधारकाला विहित मुदतीत रू.500/- (निविदाधारक मुद्रांक शुल्क खर्च करेल) च्या गैर न्यायिक मुद्रांक कागदावर करारनामा करावा लागेल.
13. इंधन/वंगण/ दुरूस्ती/टोल व वाहन चालकाचा खर्च (वेतन, भत्ते प्रवास भत्ते) वाहन मालकास द्यावे लागेल. पुरवठा आदेश दिल्यानंतर वाहनाशी संबधित कुठल्याही इंधन,वंगण, सुटेभाग अथवा अनुषंगिक बाबींचे दरवाढीचा विचार होणार नाही.
14. वाहनाचा वापर ग्रामीण भाग, डोंगराळ व अतिदुर्गम आदिवासी भागात केला जाईल.
15. वाहन पुर्ण काळ म्हणजे 24 तास कार्यालयास उपलब्ध असावे. (शनिवार, रविवार व इतर शासकिय सुट्टयांचे दिवसांसह).
16. पुरवठाधारकाने वाहनाचे लॉगबुक ठेवावे. त्याआधारे देयक अदा करण्यात येईल. टोलटॅक्स देण्याची जबाबदारी वाहन पुरवठा धारकांची असेल. देयकासोबत त्या सादर केल्यानंतर त्याची प्रतीपुर्ती केली जाईल. वाहन नेहमी सुस्थितीत व स्वच्छ असावे.
17. किरकोळ अथवा मोठया स्वरूपाची दुरूस्ती करणे निविदाधारकाची जबाबदारी राहील.
18. किरकोळ स्वरूपाची दुरूस्ती एका दिवसात व मोठया स्वरूपाची दुरूस्ती तीन दिवसात करून देण्याची जबाबदारी निविधाराकाची राहील.
19. वाहनाचे दुरूस्तीचे कालावधीत दुसऱ्या वाहनाची त्वरीत पर्यायी व्यवस्था करून देण्यांची जबाबदारी निविदा धारकाची राहील.
20. वाहनाचे मेंटन्स खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्यांची संपुर्ण जाबाबदारी ही वाहन मालकाची राहील. मुक्काम दरम्यानच्या काळात पुरवठाधारक वा वाहनचालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता वा लाभ कार्यालयाकडून लागू असणार नाही.
21. वाहन दुरूस्तीसाठी अथवा वाहन दुसऱ्या गावावरून इंधन भरून आणण्यासाठी होणारी धाव ही कार्यालयीन वापराबाबत कामकाजाच्या धावेत समाविष्ठ असणार नाही.
22. वाहन केवळ मालकाच्या (निविदाधारकाच्या) अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाल्यास निर्धारित कंत्राट ठरल्यानंतर जे प्रतिदिवस दर येईल त्याप्रामणे तेवढया दिवसाची रक्कम आपले मासिक भाडयाचे रकमेतून कपात करण्यांत येईल अथवा निविदा रद्द करून संबधित निविदाधारकावर प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल.
23. सन जानेवारी 2023 व त्यानंतरच्या वर्षात नोंदणी झालेले व सुस्थित, आरामदायक वाहन भाडयाने घेण्यांत येईत.
24. वाहनाचे सर्व दस्ताऐवज आर.टी.ओ नियमाप्रमाणे अद्यावत ठेवावे लागेल तसेच आदेश प्राप्त होताच वाहनाचे आर.सी. व टी.सी. बुक, इन्शुरन्स, पियुसी सर्टीफिकेट वाहनचालकाचे वाहन चालविणेबाबत परवाना, प्रवासी

वाहन परवानाची मुळ प्रत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि. प. चंद्रपूर कार्यालयास दाखवून तपासणी करून घ्यावी.

25. निविदेत जे वाहन क्रमांक दर्शविण्यांत येईल तेच वाहन कार्यालयात आदेश मिळाल्यानंतर कार्यालयात कार्यरत राहील. काही कारणास्तव वाहन बदली करावयाचे झाल्यास कार्यालयाकडून पुर्व परवानी घ्यावी लागेल.
26. वाहनाची कि.मी. चैन (मिटर) अद्यावत व कार्यरत राहील याची नोंद घ्यावी.
27. पुर्व परवानगी शिवाय वाहनाचा वापर कार्यालयीन कामाव्यतीरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनाकरीता करण्यांत येणार नाही.
28. आयकर विभागाच्या नियमानुसार देय असलेला कर वाहन मालकाला भरावा लागेल.
29. पुरवठा आदेश मिळाल्यापासून मासिक करार झालेले वाहन 02 दिवसांचे कालावधीत पुरवठा होणे आवश्यक आहे. व ऑन कॉल बेसीस तत्वावर वाहनांचा पुरवठा मागणी केल्यानुसार तात्काळ करावा लागेल
30. कराराचा कालावधी पुरवठा आदेश दिल्यापासून 12 महिण्यांकरीता लागू राहील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.**
**तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**